MSFDA
वार्ता
Maharashtra State
Faculty Development Academy
Quarterly Newsletter | Issue No. 2 | August 2023

# तरंग...
## शिकण्याच्या खोल समुद्रात मारलेला सूर

**अंजु उप्पल**
सहसंचालक, MSFDA

कधी एकदा कॉलेजला जातोय असं नेहमीच तरुण तरुणींना वाटतं...

स्वतःच्या आशाआकांक्षा असलेली एक व्यक्ती म्हणून जगण्याचं स्वातंत्र्य मला कॉलेजच देईल याची त्यांना अगदी खात्री असते.

तरंगही असाच एक... पण त्याला जे कॉलेज हवं होतं, त्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळण्याची संधी फक्त एका टक्क्याने हुकली होती. नाईलाजाने त्याच्या दुसऱ्या पसंतीच्या कॉलेजमध्ये त्याला प्रवेश घ्यावा लागला होता. "दर शनिवार-रविवार मित्रांसोबत फिरायला न जाता आणि न खेळता अभ्यास केला असता तर...," तो खिन्नपणे म्हणाला. तरंगच्या आईवडीलांनी त्याला दिवसाचे बारा-बारा तास अभ्यास करताना पाहिलं होतं, त्यामुळे आपल्या मुलाला अजून चांगले गुण मिळायला हवे होते असं त्यांनाही वाटलंच. परंतु मानसिक ताणामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांना आपला लाडका बळी पडू शकतो या भीतीने त्यांनी त्याचं कौतुकच केलं आणि सांत्वनसुद्धा.

महाविद्यालयाच्या पहिल्या दिवशी तरंग एकदम ऐटीत चालत मेन गेट मधून आत शिरला. अर्थातच त्याच्यासारखे बरेचजण होते. तो पायऱ्या चढून दुसऱ्या मजल्यावर त्याच्या वर्गात जाऊन पहिल्याच बाकावर बसला. त्याने आजूबाजूला पाहिलं तर सगळे बाक नीट एका रांगेत फळ्याकडे तोंड करून लावले होते. इतक्यात बेल वाजली. धावत पळत वर्गात येणाऱ्या सगळ्या विद्यार्थ्यांनी तरंगच्या मागे असलेल्या बाकांवर भराभर जागा पटकावल्या; एकमेकांकडे पाठ आणि फळ्याकडे तोंड करून! एक शिक्षक हातात काही पुस्तकं घेऊन वर्गात आले, त्याक्षणी सगळे विद्यार्थी उठून उभे रहात त्यांना 'गुड मॉर्निंग' म्हणाले. 'बसा, बसा, मुलांनो', एक गंभीर, खर्जातील आवाज आला. 'युनिफॉर्म नाही, शाळेची दप्तरंदेखील नाहीत तरीही काही वेगळं का जाणवत नाही!' तरंग विचारात हरवून गेला...

शिकण्याचा व्यवहार उत्तम व्हावा यासाठी आवश्यक ते सगळं नेहमीच्या पद्धतीने नीटच आखलेलं होते – हातात एक पुस्तक असलेले सर, एक व्यासपीठ त्यावर एक टेबल, एक फळा आणि काही शब्द व वाक्य अधोरेखित करण्यासाठी रंगीत खडू. वर्गातला तास संपण्यापूर्वी थोडा वेळ काही विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करून दिल्यानंतर विशिष्ट मुदतीत पूर्ण करण्यासाठी एक असाइनमेंट देऊन हा वर्ग संपला. मग अजून एक दुसरा वर्ग, वेगळेच शिक्षक, नवा विषय आणि शिकवण्याची निराळीच पद्धत, परंतु तीही कधीतरीच! कधी वाचन आणि त्यानंतर चर्चा, वादविवाद, कधीतरी अभ्यास किंवा कुठल्याशा ठिकाणाला भेट. परंतु यातील प्रत्येक वर्गाचा शेवट हा विद्यार्थ्यांना असाइनमेंट किंवा एखादा प्रोजेक्ट करायला सांगण्यानेच झाला. तरंगच्या मनात विचार आला, आता ग्रेडस् खूप महत्त्वाच्या आहेत.

तरंगला नेहमीच प्रश्न पडायचा, प्रोजेक्ट आणि असाइनमेंट्स करणे या शिकण्यासाठी उत्तम प्रक्रिया आहेतच – परंतु ही पद्धत अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करण्यासाठी एक

अधिक सोयीस्कर पद्धत म्हणून तर स्वीकारली नसेल ना?

त्याला असं खात्रीनं वाटण्याचं कारण एकदा असाइनमेंट पूर्ण करून दिल्या आणि त्यांना ग्रेडस् मिळाल्या की तो विषय संपायचा. नवीन विषयाला आधीच्या विषयाशी जोडून घेण्यासाठी जिथं शिक्षक आणि विद्यार्थी दोघांकडे ही अवकाशच कमी होता, तिथे विषयाचा वर्गाबाहेरील जगाशी संबंध जोडणं तर सोडूनच द्या!

ज्याप्रमाणे शिकवण्याची एक विशिष्ट पद्धत आहे, त्याचप्रमाणे शिकण्याची एक पद्धत विद्यार्थ्यांसाठीही ठरलेली आहे. अभ्यासक्रम सत्रांमध्ये विभागला आहे आणि विषय वर्गातील तासांमध्ये विभागले आहेत. विद्यार्थ्यांनी विषयानुसार त्या त्या वर्गात जाणे, असाइनमेंट अथवा प्रोजेक्ट पूर्ण करण्यासाठी खूप मेहनत घेणे आणि हे करताना शिकण्याची विशिष्ट पद्धत व शिस्त पाळणे हे विद्यार्थ्यांकडून अपेक्षित आहे. विद्यार्थी परीक्षेला बसतात, ग्रेडस् मिळवतात आणि पुढच्या वर्गात जातात. या चाकोरीबद्धतेमुळे जीवशास्त्राचं गणिताशी, इतिहासाचं साहित्याशी आणि पुढे जीवशास्त्राचं साहित्याशी असलेलं नातं पहायला देखील अजिबात वेळ नसतो आणि तसा वावही नसतो. शिकवण्याच्या या बंदिस्त पद्धतीमुळे वेगवेगळ्या विषयांना जीवन आणि समाजाशी जोडणं राहूनच जातं.

तरंग आता पदवी अध्ययनाच्या तिसऱ्या वर्षात होता. कुठलातरी स्पेशल विषय निवडण्याची त्याच्यावर वेळ आली तेव्हा त्याची द्विधा मनस्थिती झाली. इतर दुसऱ्या विषयांमध्ये करिअरच्या अधिक चांगल्या संधी असल्याने, त्याला आवडणारा विषय त्याने न निवडता, त्या दुसऱ्या (भलत्याच) विषयाची निवड करावी असा सल्ला त्याला देण्यात आला.

या सगळ्या दरम्यान तरंगला कॉलेजमध्ये काही मौल्यवान क्षण गवसले होते. त्याच्या धमाल मित्रांचा मोठा कंपू होता – तरंग, विवेक, नाझ, गरिमा, रझा, थॉमस, रिफू, साया, पेस्टन सगळे एकमेकांचे घट्ट मित्र होते. कॉलेज संपल्यानंतर ते कॅन्टीनमध्ये तासन् तास मजेत घालवायचे आणि अनेकदा रस्त्याच्या कडेला असलेल्या चहाच्या स्टॉलवर पुन्हा एकत्र जमायचे. त्यांनी एकमेकांची काळजी तर घेतलीच शिवाय जगण्याच्या चढ उतारात आपापल्या परीने एकमेकांना आधार द्यायलाही सुरुवात केली. त्यांच्याकडे बोलण्यासारखं, ऐकण्यासारखं, शेअर करण्यासारखं आणि व्यक्त करण्यासारखं खूप काही होतं. केवळ स्वतःबद्दलच नाही तर, नातेसंबंध आणि इच्छा, पालकांचा आणि महाविद्यालयाचा त्यांच्यावर असलेला ताण, स्थानिक आणि जागतिक बातम्या, राजकारण आणि धोरणे, संघर्ष आणि स्वप्न, तत्त्वज्ञान आणि त्याचा रोजच्या जगण्यातला वापर... असे अनेक विषय!

महाविद्यालयातील वर्गाबाहेरच्या या मुक्त अवकाशाने तरंग आणि त्याच्या मित्र मैत्रिणींना तसचं इतर अनेक विद्यार्थ्यांना प्रगल्भ केलं. भावना, संघर्ष, नातेसंबंध आणि सतत करावी लागणारी निवड या सगळ्याला सामोरं जाण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये याच मुक्त अवकाशाने त्यांच्यात रुजवली आणि त्यांना समृद्ध केलं. या कंपूला एक प्रश्न मात्र अनेकदा पडायचा, मग वर्ग, प्रयोगशाळा आणि ग्रंथालय हेच समृद्ध होण्याचं अवकाश का बनू शकत नाही?

तरंग आणि त्याच्या कंपूला पडलेले प्रश्न अगदीच स्वाभाविक होते. किमान संवेदनशीलता असलेल्या कुणालाही ते विचार करायला भाग पडतील असे. याबाबत आजूबाजूला नजर टाकली तर काय परिस्थिती आहे?

गेल्या काही वर्षांत, शिक्षण आणि शैक्षणिक संस्थांमध्ये घडणाऱ्या परिवर्तनाच्या संदर्भात बरेच नवीन विचार मांडले जात आहेत. त्यापैकी एक म्हणजे शिक्षणातील 'विद्यार्थी केंद्रितते' वर भर देणं. बऱ्याच महाविद्यालयांनी स्वतःच्या व्हिजन स्टेटमेंट्स आणि वेबसाइट्समध्ये 'विद्यार्थी केंद्रीभूतता' समाविष्ट केली आहे. आपल्या दृष्टिकोनात बदल करून तो 'अध्यापनाकडून शिकण्याकडे' असायला हवा ही गरज त्यांनी वेळीच ओळखली आहे. प्रकल्प, असाइनमेंट, गटचर्चा व सादरीकरण यासाठी अनेक महाविद्यालयांनी त्यांच्या शिकवण्याच्या पद्धतीची नव्याने संकल्पना व रचना केली आहे. 'विद्यार्थी-केंद्रितता' ही केवळ वर्गात शिकण्याच्या पद्धतींमध्ये बदल करण्यापुरती मर्यादित आहे का की वर्गाबाहेरील अवकाशात शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात असलेले संबंध आणि शिक्षकांचा विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन या दोन्हीत देखील अमुलाग्र बदल होण्याची निकड आहे?

विद्यार्थ्यांना स्वतःचं मन आहे आणि हे तरुण स्वतंत्र विचार करू शकतात हे महाविद्यालयांनी समजून-उमजून सहर्ष स्वीकारण्याची वेळ आली आहे.

खलील जिब्रान म्हणतात त्याप्रमाणे,

"Your children are not your children.
They are the sons and daughters of
Life's longing for itself.
They come through you but not from you. And
though they are with you,
they belong not to you.
You may give them your love but not
your thoughts.
For they have their own thoughts.
You may house their bodies but not
their souls,
For their souls dwell in the house of
tomorrow, Which you cannot visit, not even in
your dreams.
You may strive to be like them, but
seek not to make them like you.
For life goes not backward nor tarries with
yesterday"

'सुरक्षित आणि सक्षम, पदानुक्रममुक्त आणि स्पर्धामुक्त, निर्भय शैक्षणिक वातावरण निर्माण करणे ही शैक्षणिक संस्थांची भूमिका असणं गरजेचं आहे. साच्यातले एकसारखे विद्यार्थी बनवण्याऐवजी सर्जनशील विद्यार्थी घडवणे ही प्रक्रिया सुरु करणे आणि नंतर ती मजबूत करणे याच दिशेने सगळे प्रयत्न व्हायला हवेत. सर्जनशील आणि गंभीर विचारांना प्रोत्साहन देणारा, परस्पर आदराची मूल्ये जोपासणारा, उदारपणे सर्वसमावेशक आणि सन्मानाची जाणीव जपणारा एक चिरंतन उत्साही अवकाश असणं हे महाविद्यालयांसाठी अत्यावश्यक आहे आणि बहुधा, महाविद्यालयांचा 'शैक्षणिक संस्था' म्हणून बहरण्याचा हा एकच मार्ग आहे.

इतरांनी सक्षम व्हावं म्हणून शिक्षणतज्ज्ञ आणि प्रशासक आपलं एक पाऊल मागे घेऊन स्वतःला जाणीवपूर्वक 'अक्षम' करण्यास इच्छुक आहेत का?

तरंग, त्याचे मित्र आणि इतर अनेक तरुण तरुणींना हे जाणून घ्यायची खूप इच्छा आहे.

(मराठी भाषांतर: अर्चना दीक्षित)

---

**संपादक मंडळ:**
हर्षदा बाबरेकर, अपूर्वा बर्वे, गीतांजली दाते,
प्रतिक ढमाल, संजय लेले, सुहासिनी देसाई,
सुजाथा वरदराजन, सिबील थॉमस

**मार्गदर्शक:** निपुण विनायक, अंजु उप्पल

**अंक मांडणी:** संदेश भंडारे

# संपादकीय

Here is the second issue of *Warta!* The quarterly publication of MSFDA *Warta* is an opportunity to deep-dive into MSFDA values.

In this edition, we explore student-centricity in the ever-evolving landscape of higher education. There is a need for paradigm shift from a top-down approach to placing students at the centre, 'the core' of the education system. It is high time we realise that learning is shaped by many factors and one of the most important is the context, background, experience, and interest of the learner. While being together, sharing, and collaborating may be important, learning is also a personal journey of the learner.

Student-centricity in education isn't just a trend, it's a necessity. We are a diverse and heterogeneous society and students come from varied social-eco-cultural background. This needs to be appreciated and recognised in order to identify unique learning needs and interests. This simply means acknowledging that every student have a distinct learning pace & preference and the teacher needs to be mindful of weaving in a range of methods that enable a safe and enriching learning experience.

Importantly, it means shedding away one's power and position as a teacher-educator, considering it as a role rather than a static position, moving out of classrooms, reimagining the relationship between teacher and student, keeping well-being, creativity, and building critical thinking at the core.

To conclude, student-centric education is a transformative shift that empowers students to be active, participants, taking charge of their learning. The teacher-educator playing the important role of an enabler-guide bosting the capacity and potential of every student.

# Community of Practice
## - Coming together to make sense of the elephant!

**Asim Auti**

Coordinator MS-DEED, IISER

Stories, whether based on history, mythology or fiction, shape our thinking and provide a framework for understanding the world around us, particularly in India where they are deeply ingrained in our culture. One such parable that has transcended generations is that of 'the elephant and the blind men'. Fascinated and intrigued by something new that has entered the town, blind (wo)men try to grasp what it is by touching the elephant. Unable to get a holistic picture, they share subjective interpretations based on their own experiences resulting in disagreements, and the situation comes to blows.

The story tells us that we have a tendency to claim absolute truth based on our limited, subjective experience, ignoring others' personal experiences that may be equally true. Could something good come out of such subjective views of holistic systems?

### The teacher community: thoughts and actions


As science educators, we face new challenges in the classroom, almost every day, that require addressal, our version of the 'elephant' in the (class)room. Given these varied situations, each of us carry a unique perspective on science education and practice, based on personal experience. For the teacher community, sharing these perspectives can enrich collective understanding of challenges and approaches in teaching, which in turn, would help the community innovate and create better learning experiences for students.

The 'community of practice' concept has been successfully explored in many professions, enabling practitioners to share knowledge, ideas and solutions to advance their fields. However, the teaching community, has not fully embraced this concept. Wherever sharing happens, most of the sharing gets centred around administrative workings that don't concern us or policies beyond our purview. This article shares a few steps towards initiating and building a 'community of practice' for educators in India.

### Seeking support from peers

The teaching community needs platforms to discuss various concerns, including student challenges, science practice in resource-limited environments, digital pedagogy, and implementing NEP 2020 in classrooms. In today's demanding educational landscape, a teacher cannot be expected to navigate these challenges alone, relying solely on individual abilities to guide students towards effective learning.

One relatively low hanging approach to building a 'community of practice' in education is peer-support among educators.



Building in person peer-support or meet up groups with teachers in local institutions or via regional collaborations,can offer insights into varied challenges, opportunities to share success stories and solutions, and build an understanding of larger educational initiatives such as policy and program changes.

**Building communities of individuals**


In addition to local peer-support groups, community-led in-person or online forums or '*Kattas* (https://www.ibiology.org/science-and-society/katta-model/)' are good models for teachers to share ideas, concerns and solutions related to contemporary educational practice. These settings can prioritise topics that teachers want to listen to, discuss and act on. Nowadays, use of social media and communication applications like WhatsApp to engage teacher participants is very effective, and I can vouch for this via personal experience.

Steps could be taken to converge these practitioner groups to form a large and integrated community. While these systems may exist, it is up to us practising teachers to create a critical mass and extend the benefits of community sharing to practice. What comes out of these communities should also be tried and tested by individuals in their own classrooms, as there is no 'one size fits all' solution. Effectively shared ideas, concepts, and philosophies can help to enrich the academic environment and loop the feedback into the community.

**Faculty Development Programmes (FDPs)**

FDPs are meant to upgrade teacher skills in select fields, but why can't they also serve as a platform for building a community of practice? This could be done via well-designed teacher development programmes, focused on implementing a community of practice, via teacher education and training. Various educational and human resource development agencies could work together to network teachers nationwide and promote open forum environments for teachers to share practices and solutions. At the MS-DEED programme *(https://sites.google.com/acads.iiserpune.ac.in/ms-deed-msfda-iiser-pune/home?pli=1) at IISER Pune, initiated with the MSFDA (http://msfda.org.in/),* Government of Maharashtra, we are trying out this approach by enabling environments for open interactions among teachers.

We observe that FDPs, workshops and meetings that encourage networking among educators and promote a community of practice are beneficial for an educator's growth. We have developed a few sessions and activities that facilitate open discussions on challenges and solutions for implementing new skills and knowledge gained during our workshops. Some participants have started discussions without our interventions. These learnings have allowed us to unlearn traditional teaching methods, embrace ideas of inclusivity in a diverse classroom, and explore new assessment techniques.



Support pyramid for the teacher community (created by Asim Auti)

**Roles of academic administrators**

In addition to community-led efforts, sustained initiatives will require continuous support from multiple stakeholders. Along with educators and academics, the administrators of Higher Education Institutes (HEIS), such as principals, directors and deans, can specify long-term visions and actions to bring teachers together to enrich local academic environments. Often, administrators belong to, or hail from, the same pool of educators working in the Indian education system, and therefore possess the insights and understanding needed to update policies and practices.

Administrators can design nationwide networking programmes for teachers, including those based on affinities to the subject being taught, regions, or languages. These formal networks will not only encourage teachers to share their professional experiences, but also enable modes of evaluation and assessment of teaching practices and interventions.

Taken together, 'community of practice' platforms can foster the sharing of challenges, solutions, and approaches among teachers, with benefits across the teaching and learning spectrum. There's strength in numbers, and together we can make sense of the elephant.

The author wishes to thank fellow educators & administrators: Anand Deshpande, Apurva Barve, Ketaki Patankar, Malika Pathak, Prashant Ratnaparkhi, and V Pendsey.

(Edited by Ankita Rathore and Karishma S Kaushik)

*This article has already been published on IndiaBioscience.org*

# The Lingustic Landscape of India

**Sonal Kulkarni - Joshi**
Prof. Deccan College, Pune

India's society, culture, history and politics have continuously been shaped by the multiplicity of her languages. The country is aptly described as a linguistic giant. So, how many languages are spoken in India? The country is home to speakers of about 461 languages (see Ethnologue https://www.ethnologue.com/country/in). Of these 447 languages are alive in the sense that they are actively used in daily communication while 14 are extinct - they no longer fulfil any communication need. 121 of these languages have more than ten thousand speakers and twenty-two of these are officially recognised in the Indian constitution. These include Assamese, Bengali, Bodo, Dogri, Gujarati, Hindi, Kannada, Kashmiri, Konkani, Malayalam, Manipuri, Marathi, Maithili, Nepali, Oriya, Punjabi, Sanskrit, Santali, Sindhi, Tamil, Telugu and Urdu. These are referred to as the 'scheduled languages' and 96.72 % Indians speak one of these languages as their mother tongue (Census, 2011). Hindi is spoken by a majority of the Indian population (26.6%), followed by Bangla (7.94%), Marathi (6.84%) and Telugu (6.68%; source: Census of India 2011). Of the scheduled languages, Hindi is recognised as the national official language; English is used at the national level as a subsidiary official language. Post-independence, the Indian states were carved out along linguistic lines: Marathi in Maharashtra, Bangla in West Bengal, Kannada in Karnataka and so on. Hindi and the other scheduled languages are used as official languages in the Indian states – they are used in regional administration and education. Thus, unlike many monolingual countries which have a single official language (e.g. Japanese in Japan, French in France and so on), there is no single 'Indian' language.

> The main language families of India are the following: Indo-Aryan, this family includes major languages such as Hindi, Punjabi, Nepali, Marathi, Oriya, Bangla and Axomiya as well as tribal languages such as Bhili and Katkari.

Enumerating languages in India is a ticklish issue, largely because of the blurred distinction between language and dialect. Hindi and Urdu are regarded as separate languages in spite of very strong linguistic similarities between them, as are Marathi and Konkani. The Tangkhul dialects spoken in the state of Manipur are not all mutually intelligible, but the speakers regard these varieties as constituting a single language. According to the Census, 43.6% of the population speaks Hindi as the mother tongue – this includes more than forty dialects of Hindi such as Angika, Awadhi, Bagheli, Bhojpuri, Braj, Chhatisgarhi and so on.

Languages carry signatures of the varied ancestries of the people of the land. Hence, like people, languages can be classified into various language families based on the genealogical similarities among

them. The main language families of India are the following: Indo-Aryan - this family includes major languages such as Hindi, Punjabi, Nepali, Marathi, Oriya, Bangla and Axomiya as well as tribal languages such as Bhili and Katkari. These languages have descended from the classical language, Sanskrit via the Prakrits. In the present times, the members of this language family spread from north-west India to north-east India, occupying the plains of north India. The Dravidian family of languages includes four major, literary languages in southern India – Tamil, Malayalam, Kannada and Telugu - as well as a number of tribal languages such as Toda in the Nilgiri Hills and Gondi and Malto in central India. The Munda group of the Austro-Asiatic languages includes Santali, Mundari, Ho and a few other tribal languages spoken in Central India. The Tibeto-Burman family of languages is represented by languages such as Manipuri, Bodo and almost a hundred other tribal languages spoken in north-east India. The Daic family of languages in Arunachal Pradesh and in Assam and the Andamanese language family in the Andaman islands are two smaller genealogical groups in the country. All of these language groups share ancestry with languages in other parts of the world: Indo-Aryan languages are historically related to languages in Europe which were derived from Latin and Greek. Thus Bangla, Hindi, Persian, English, German and Dutch are all distant cousins. The Munda / Austro-Asiatic languages are genetically related to languages in Vietnam and Cambodia while the Tibeto-Burman languages are relations of languages spoken in Nepal, Myanmar, Bhutan and China. Speakers of the different language families are said to have arrived in the Indian sub-continent at different times in the prehistory of India; the ancestors of the speakers of the Great Andamanese language belonged, perhaps, to the first migration of humans out of Africa into South and South-East Asia.

A large proportion of Indians use their multilinguality to index multiple identities – local, regional, national and so on. Very often the knowledge of multiple languages is acquired not in school but in multilingual neighbourhoods. It is not at all uncommon for a child growing up in a town like, say, Solapur to speak a variety of Telugu as the home language with the family, the local contact language, Marathi, with friends in school, a smattering of Kannada with the neighbours and some Hindi and/or English in the school. This linguistic division of labour is very characteristic of the Indian experience.

Language in India has a complex relation with writing. Not all Indian languages are written though rich oral traditions flourished for these languages. The development of writing is associated mainly with commercial record-keeping rather than any religious or social activity. Scripts used in the present day for writing all Indian languages are predominantly derived from the Brahmi script. Devanagari or Nagari, its modern derivative, is used to write Hindi, Marathi, Konkani and Sanskrit.

The recitation of Devanagari system follows a phonetic order in which vowels precede the consonants. Symbols of the writing system are ordered such that sounds produced at the back of the mouth cavity (ka, kha, ga, gha) are followed by those produced progressively in the front of the mouth cavity (cha, chha, ja, jha and pa, pha, ba, bha). Another characteristic of the writing system is that the vowel is inherently present in the consonant symbol. Local scripts were devised and adopted for some languages – for example, Ol Chiki for Santali in Jharkhand, West Bengal and Orissa; Kaithi and Tirhuta for Maithili. Some Indian languages are written in more than one script – Devanagari and Perso-Arabic for Sindhi; Devanagari, Malayalam, Kannada, Perso-Arabic and Roman for Konkani.

Irrespective of their varying ancestries, the speakers of the various Indian languages have not lived in isolation. Over millennia, they have intermingled for social, economic and other reasons. In the process,

their languages have been enriched with words and constructions from the surrounding languages. Such processes of assimilation and convergence define the Indianness of the multitude of languages. For example, all Indian languages have echo forms such as cay-vay ‘tea and such other things’ in Hindi, killa-billa ‘fort and such other things’ in Marathi, iskul-phiskul ‘school and the like’ in Oriya, bokop-tokop ‘brothers and the like’ in Santali, kudirai-gidirai ‘horses and such other animals’ in Tamil, etc.; vector verbs such as likh dalo ‘write (it) and be done with it’ in Hindi, hak bidu ‘put (it) and be done with it’ in Kannada, and so on. These and several other such shared linguistic traits highlight the unity underlying the country’s linguistic diversity.

## Through the Lens -

### a photography exhibition on higher education

MSFDA in collaboration with Photography Promotion Trust (PPT) conducted a programme for faculty and students from selected colleges of Maharashtra.

The programme was an enriching learning experience for 40 participants to engage with Padmashri awardee Sudharak Olwe, a social documentary photographer along with other resource persons Prof. Y.S.Alone, teacher at JNU; Amrit Gangar, film historian, critic, curator and writer; Sanjeev Sonpimpare, award-winning visual artist/painter; artist Riyaz Komu. The three-phase programme enabled participants to be amateur documentary photo-storytellers.

The programme culminated into a permanent exhibition displayed at MSFDA Pune providing an intriguing glimpse into the world of academic spaces through the multi-layered narratives of the students and teachers.

*(Herein, we share one photograph from the exhibition along with its caption)*




The agitated female students of this college complain about having to wash dishes during an NSS camp while their male counterparts get away saying that it’s a woman’s job. However, the complaint continues to be laughed at. How deeply ingrained these gender roles are!

# कॅलिडोस्कोप

**सुचित्रा आ. नाईक**

प्राचार्या, जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

मागील वर्षी एप्रिल महिन्यामध्ये एम.एस.एफ.डी.ए. तर्फे महाराष्ट्रातील प्राचार्यांसाठी एक अतिशय सुंदर असा "Transition to Leadership" प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. साधारणतः शैक्षणिक जगतामध्ये असतो, त्याहून हा कार्यक्रम फारच निराळा होता. जॉन डीवे या अमेरिकन शिक्षण तज्ञाचे एक फार प्रसिद्ध वाक्य आहे. ते म्हणतात, "शिक्षण म्हणजे जीवनानुभवाची तयारी नसून तो साक्षात जीवनानुभव असतो. तसा तो असणे अपेक्षित असते." भारताच्या २०२०च्या शैक्षणिक धोरणामध्ये काहीसा हाच विचार अभिप्रेत आहे. शिक्षण हे भयमुक्त, साक्षात अनुभवाधिष्ठित, प्रत्यक्षदर्शी व कौशल्याधिष्ठित असावे अशी दृष्टी या नवीन शैक्षणिकधोरणामध्ये मंडलेली आहे. प्राचार्यांसोबत झालेल्या या कार्यक्रमांमध्ये एम.एस.एफ.डी.ए. ने नवदृष्टी देण्याचा, कल्टीवेट करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्राचार्य या पदाची एक मोठी गंमत आहे. फक्त एकच किंवा वेगवेगळ्या महाविद्यालयाचा विचार केल्यास प्राचार्य हे सर्वोच्च पद समजले जाते. सर्व निर्णय हे या मध्यवर्ती पदावरून घ्यावे लागतात. पण संपूर्ण उच्च शिक्षण क्षेत्राचा विचार केल्यास, प्राचार्य हे बऱ्यापैकी बाह्य वर्तुळा मध्ये असलेले पद आहे. उच्च शिक्षणाच्या उतरंडीमध्ये प्राचार्य हे अगदीच पहिल्या पायरीवर असतात. या दोन्ही स्थितीचे भान असणे आणि त्याचा समतोल राखता येणे, हे प्राचार्यांसाठी खरे तर आव्हानच असते. म्हटले तर एकल आणि म्हटले तर सर्वांसोबत, असे काम प्राचार्यांना सतत निभवत राहावे लागते. त्या गोष्टीचा ताणही असतो. एक मुखवटा कायम चढवलेला असतो.

या कार्यक्रमामुळे या सर्व ताण-तणावातून थोडे मुक्त होता आले. एरवीच्या एकटेपणाच्या कल्पनेतून मुक्ती मिळाली, कारण तिथे आलेला जो तो आपल्यासारखाच आहे हे समजत होते. या कार्यक्रमांमध्ये नेमके काय काय होते? माहिती, विचार, भावना या सर्वांचे एकमेकांसोबत केलेले आदान-प्रदान होते. कल्पनाशक्तीला चालना देणारी अनेक कथित इथे होती. एकमेकांचे अनुभव, निर्णयात्मक (judgmental) न होता, ताडून पाहता येत होते आणि उच्च शिक्षणाविषयीची अनेक कथित, अनेक संवाद, काही विसंवाद या संपूर्ण चर्चाविश्वामध्ये होते.

खरे सांगायचे तर, जे कोणी मान्यवर इथे आले होते आणि जे कोणते विषय चर्चिले गेले. त्या सर्वांमुळे उच्च शिक्षणाविषयीचा एक शोभादर्शक आकृतीचा आरसाच (kaleidoscope) तयार झाला. नेतृत्व विकासाचे बहुअंगी विश्लेषण, नेतृत्वाचे शैक्षणिक, बहु आयामी दर्शन, या सर्व परस्परसंवादा मधून सतत घडत होते. यातील काही ठळक विषय पुढील प्रमाणे होते. नेतृत्वाचा मानसशास्त्रीय विकास, मध्यवर्ती प्रशासन (hardcore administration), प्रशासन व कायदा, नाट्यानुभवातून शिक्षण, भारत आणि इंडियाचा भेद (divide), समाजभान, राजकीय भान, स्व-भान, आपण उभे असलेले इतिहासाचे टप्पे, भविष्यकाळ आणि इतर खूप काही. शिक्षण क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवर या कार्यक्रमांमध्ये संसाधन-व्यक्ती (resource person) म्हणून आले होते. त्यांचे प्रत्येकाचे शिक्षण क्षेत्रातले, सामाजिक क्षेत्रातले, योगदान वादातीत होते. तरीही या सर्व मान्यवर मंडळी विषयी जाणवलेला एक सामान्य विशेष किंवा धागा म्हणजे त्यांचा साधेपणा, त्यांची शिक्षणाविषयीची व विद्यार्थ्यांविषयीची, समाजाविषयीची कळकळ, पाय मातीत घट्ट रोवून आकाशाला गवसणी घालण्याची वृत्ती, "या सर्वांचा, या हृदयीचे "- त्या हृदयी असा परिणाम आमच्यावर झाला.



त्यांनी स्वतः आपापल्या ठिकाणी केलेल्या अनेक प्रयोगांची चर्चा आमच्या सोबत घडली. सतत प्रयोगशील असणे, न कंटाळता छोटे छोटे का होईना, पण नवनवे उपक्रम करत राहणे ही तशीही प्राचार्य पदाकडून असलेली अपेक्षा आहे. त्यामुळेच अशा अनेक प्रयोगांची माहिती झाली. थोडेसे निराळे आयाम असलेल्या दोन प्रयोगांचा निर्देश इथे आवर्जून करावासा वाटतो. ते म्हणजे डॉ. आनंद नाडकर्णी यांनी मांडलेली प्रज्ञा परिसर ही संकल्पना. (जी आम्ही आमच्या महाविद्यालया मध्ये राबवायला सुरुवात केली). तसेच श्री. अतुल पेठे यांनी मांडलेली, नाट्यानुभवातून शिक्षण व संस्कार ही संकल्पना. प्रज्ञा परिसरची दृष्टीही खूपशी भयमुक्त, शिक्षणाच्या जवळ जाणारी संकल्पना आहे. आपण आज प्लास्टिक मुक्त परिसर तसेच पर्यावरणास अनुकुल असा परिसर (eco-friendly campus) याबद्दल खूप बोलतो, त्याविषयी काम करतो आपली इकोसिस्टीम आपला भोवताल स्वच्छ, प्रदूषणमुक्त असावा असा कटाक्ष आपल्या सर्वांच्या मनामध्ये आज असतो. याच धरतीवर, जर का आपण भावनामुक्त, भयमुक्त परिसर ज्याला त्याला आपले वाटावे असा भावपूर्ण परिसर निर्माण करू शकतो का? आणि कसा? हा विचार प्रज्ञा परिसरच्या संकल्पनेमध्ये आहे. तसेच पुस्तक व वाचनाविषयीच्या, नाट्याविष्कारांमधून ज्यामध्ये विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग असतो, तो एक संस्कार निर्माण करण्यात, वाचनाची गोडी लावण्यात, वाचनाशी मैत्री साधण्यात, कसा उपयोगी ठरू शकतो हे लक्षात आले.

सर्व जगाच्या ज्ञानाची गुरुकिल्ली ठरलेला गुगल (google) हातात घेऊन फिरणाऱ्या विद्यार्थ्यांना, पुस्तक हातात धरून, पुस्तकांशी संवाद साधायला शिकवणे, हे एक खरोखरच फार मोठे आव्हान आहे. ते आव्हान पेलताना असे काहीतरी आगळे-वेगळे, अनपेक्षित (out of the box) करणे खरे म्हणजे खूपच गरजेचे आहे. प्रज्ञा परिसर संकल्पनेसोबत, नाट्यानुभवातून शिकण्याचाही प्रयोग आम्ही महाविद्यालयामध्ये राबविला. या प्रयोगाकरिता "कवी ग्रेस" यांच्यावरील "कवी जातो तेंव्हा" ह्या कार्यक्रमाचे सादरीकरण (मुळ लेखन व रंगावृत्ती डॉ. समीर वसंत कुलकर्णी) दिग्दर्शक श्री. अमित वझे यांनी केले. ग्रेसांच्या साहित्याच्या अभिवाचना मधून एक अनोखा जीवनानुभव विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. अशी वेगवेगळ्या विषयांना वाहिलेली अनेक सत्रे या कार्यशाळेमध्ये झाली. एम.एस.एफ.डी.ए.च्या पदाधिकाऱ्यांशी मुक्त संवाद झाले. आमचे मार्गदर्शक असलेले असे हे लोक नव्या विचारांनी, नवे काहीतरी करण्याच्या प्रेरणेने इतके भारावलेले होते, उत्साही होते आणि तरीही विनम्र होते. त्यांचा उत्साह अनायासाच, आमच्यामध्ये संक्रमित झाला होता. पुन्हा एकदा तरुण, पुन्हा एकदा विद्यार्थी आणि पुन्हा एकदा उत्साही, झाल्यासारखे आम्हा सगळ्यांनाच वाटत होते.

ज्याला खरे म्हणजे या संपूर्ण कार्यशाळेची फलश्रुती व कळसाध्याय म्हणता येईल, असे सत्र म्हणजे गरुडमाची वरील "स्व: आणि संघ व्यवस्थापन प्रशिक्षण" (self team management). अगदी सुरुवातीला



गरुडमाचीवरील सत्राने कार्यशाळेचा प्रारंभ झाला. पुष्कराज आपटे व प्रशांत जोशी यांच्या देखरेखीमध्ये जवळजवळ अडीच दिवस हे प्रशिक्षण सुरू होते. सर्व स्टिरिओ टाइप्सना छेद देत प्रशिक्षणाची सुरुवातच अत्यंत वेगळ्या प्रकारच्या स्व-ओळखीच्या खेळातून झाली. रोजच्या वापरातले (casual) कपडे घालून निसर्गाच्या सानिध्यात जिथे रेंजचा पत्ता नव्हता, जिथे माणसांपेक्षा अधिक झाडे आणि वाहनांपेक्षा अधिक पक्षी होते, अशा शांत आणि रम्य ठिकाणी राहणे हीच मोठी उपलब्धती होती.

वेगवेगळे सांघिक खेळ, एकमेकांवर केलेली कुरघोडी, जिंकण्यासाठीची स्पर्धा आणि जिंकण्यासाठी आपल्या मंडळींना एकजूट ठेवावे लागणे अशा अनेक गमती जमती करता आल्या. रात्री पौर्णिमेच्या चांदण्यात, सर्व प्राचार्य मंडळी इतरत्र विखरुन ट्रेजरहंट खेळत होती. ज्या सर्व गोष्टी करताना आपण छोट्या मंडळींना, विद्यार्थ्यांना बघत असतो, त्या सगळ्या गोष्टी प्राचार्य इथे स्वतः करत आणि अनुभवत होते. आम्ही प्राचार्य पदाचा कोट काढून, विद्यार्थ्यांच्या जीन्स कुडत्यात कधी शिरलो, ते आमचे आम्हालाही कळले नाही. या सगळ्या खेळांमधला शेवटचा भाग म्हणजे रॉक क्लाइंबिंग होते. कधीतरी बोलू लागलेले गुडघे, मागे लागलेली एखादी गोळी, लोक काय म्हणतील! याचा धाक, शोभतं का या वयाला? – अशा सगळ्या डोक्यातल्या गोंधळाला बाजूला काढून आम्ही मंडळी दोऱ्या-बिरा बांधून rappling करत होतो.

वरवर पाहता उत्साहाने, गमतीने, मजेने भरलेला हा खेळ, ट्रेझर हंट चे निरनिराळे टप्पे व पत्ते शोधत पुन्हा कॅम्पच्या आवारात आलेलो आम्ही आणि शोधून काढलेल्या आमच्याच टोप्या... खरं म्हणजे "तुझं आहे, तुझं पाशी..." हाच अनुभव देऊन गेला. श्री. आपटे व श्री. जोशी आणि त्यांचा संपूर्ण संघ यांनी अत्यंत विचारपूर्वक असा एक जिवंत जीवनानुभव, जो म्हंटले तर खरा पण म्हटले तर सर्जनशीलपणे निर्माण केलेला असा अनुभव, आम्हाला दिला किंवा आम्हाला तो निर्माण करण्याची दृष्टी दिली. खूप धमाल, खूप मजा आणि खूप सारे शिक्षण असा एकूण या कार्यशाळेचा बाज होता.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या दृष्टीविषयी आपण आज खूप ऐकतोय, बोलतोय पण ही दृष्टी आपापल्या ठिकाणी एक मिशन म्हणून राबवणे हे आज प्रत्येक प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, या सगळ्यांचे आद्य कर्तव्य आहे. तसेच ते एक शिव-धनुष्य पेलण्यासारखे आव्हानही आहे. त्यामुळेच मला असे वाटते, आपण आहोत त्याहूनही दूर जाऊन, थोडंसे आपल्या परिस्थितीकडे बघता आले, तर नक्कीच आपल्याला हे आव्हान पेलण्यास त्याचा फायदा होऊ शकतो. सर्व शिक्षकांनी आणि प्राचार्यांनी जरूर घ्यावा, असाच हा अनुभव आहे. एम.एस.एफ.डी.ए तर्फे दरवर्षी एकदा तरी अशा पद्धतीने कार्यक्रम घ्यावा, अशी विनंती आहे. ज्यांनी एकदा हा अनुभव घेतला असेल, त्यांच्यासाठी ॲडव्हास् (advance) प्रशिक्षण सुरू झाल्यास माझी खात्री आहे, आम्ही सगळे प्राचार्य नक्कीच पुन्हा आवर्जून त्यात सहभागी होऊ.

# Faculty Induction Program
## An Insider's View

**Apurva Barve**
Centre Coordinator, MSFDA

It was an overwhelming moment. Thirty-three participants of MSFDA's in-house Faculty Induction Program (FIP) had gathered in a circle one last time in the resources room that had become their second home, to share one thing that had changed for them over the course of the program. As coordinator of the FIP, it was fascinating to see how diverse each one's key take-away was, from the same four-week program that they had all participated in.

Some realized why defining clear learning outcomes is important, while others understood how student-centric active learning is very effective, and yet others felt ready to try out new approaches like inquiry, constructivism or flipped classroom. Another few acknowledged that learners had different learning styles, whereas some realized that assessment can be for (and not just of) learning. One grew more comfortable with integrating technology in teaching, while another felt empowered enough to say "I don't know" in the class. For many, there was an overall broadening of perspective – they said they would try to be more open-minded, empathetic and inclusive with students. One of them said that they will now be aware of power dynamics that can lead to exclusion of certain communities. A few mentioned their realization of how the physical environment affects learning, thus deciding to explore learning spaces other than the classroom. Someone wanted to do more field visits, while another was re-thinking her views on competition/comparison and learning. Many thought that the "power of pause" before taking a crucial decision was their biggest discovery, several said that the welcoming and non-judgmental ambience allowed them free expression, and one of them even expressed that the program had helped her cope with a huge personal loss. One common thread in all this diversity was that, without exception, everyone had found lasting friendships during the course of the four weeks.

> Higher education teachers play the important role of preparing young adults to become sensitive and creative members of society and contribute meaningfully to the world.

That final hour-and-half of the program brought back memories of the month-and-half of preparation that had led to the culmination. The planning had begun with defining the program objectives and drawing up the schedule. For a four-week fully residential program meant for higher education faculty (who are no longer used to the 'learner' role!), it was very important to design a balanced learning experience. Balancing classroom sessions with field visits, collaborative group work with individual expression, intensive inputs with free time for reflection was a tightrope walk indeed! After several rounds




of discussions within the MSFDA core team, the course was organized into four broad themes, one for each week.

The first week would take a wider view to discuss the broad purpose of higher education, changing landscape of universities and emerging role of a college teacher, while familiarizing participants with the HEI structures, regulations and norms. The second and third weeks would zoom into the core roles of a college teacher - classroom transactions and interactions with students. After an in-depth exploration of how learning happens, a variety of pedagogical approaches focused on student-centric and outcome-based learning would be introduced in Week 2, along with discussions on assessment design for and as learning. Holistic student development and the factors essential for it, such as amenable learning spaces, building connections with students, including all types of learner diversities, would be explored in Week 3. The final week would zoom out to the big picture again, to view young teachers as path-breaking leaders and focusing on institutional development. Reflection and metacognition would be a recurring theme throughout, emphasizing on teaching as a reflective practice with continual learning from experiences.

The framework finalized, the next critical step was to identify and contact the right resource persons. The diverse skill sets of MSDFA members as well as collaborators were leveraged, along with other external experts. Extensive discussions with each resource person followed. To encourage participants to make their classes more participatory and active, it was important to ensure that the FIP facilitators would also incorporate this approach in their sessions and align with the broad objectives. The cardinal rule that we set for ourselves was to maintain a friendly, empathetic and accessible atmosphere, where everyone

would have the opportunity and comfort to express themselves. As the registration began to filter in, we were happy to note that 16 districts in Maharashtra were represented, with diverse disciplines such as engineering, political science, microbiology and more.

Within a few days, 33 unknown people had become friends, participating enthusiastically in the discussions, activities, assignments and outings. And almost in the blink of an eye, it was already time to say goodbye. The final feedback session brought home a sense of how strong our bond with the participants had grown and how rich the experience had been. The MSFDA campus would not be the same once they had all left!

Higher education teachers play the important role of preparing young adults to become sensitive and creative members of society and contribute meaningfully to the world. Despite this, unlike lawyers, doctors, accountants (or even school teachers who require a B.Ed.) there is neither a "license to practice" nor any support or capacity-building to equip them for the role. With masters or PhD degrees, college teachers are experts in their subject domain; but they receive no orientation about the psychological, pedagogical and social aspects of higher education. Moreover, in the digital era of readily available information and emerging AI/ML technology, the role of a teacher is now that of a facilitator of learning. There is thus a need to orient teachers to the more human and humane aspects of education. This preparation has assumed even more relevance in the context of what National Education Policy 2020 envisages. The Faculty Induction Program is an attempt to bridge this gap, and the experience of the recently concluded batch has further strengthened our conviction of the need and utility of such process-oriented, participatory capacity building programs. We look forward to many more in the future.



# नवे विचार, नव्या वाटा

**दिपमाला त्रिमूखे**
सहाय्यक प्राध्यापक, शासकीय अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय

महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था म्हणजेच (MSFDA) ने घेतलेल्या Faculty Induction Program (FIP) या प्रशिक्षणा मधे मी जून २०२३ मधे सहभागी झाले होते.

महिनाभरच्या या प्रशिक्षणानंतर मी माझ्या विद्यार्थ्यांकडे, तसेच नेहमीच्या वर्गाकडे एका नवीन दृष्टिकोनातून पाहण्यास सुरवात केली आहे. ज्याप्रकारे अतिशय चांगल्या खेळीमेळीच्या वातावरणात आम्ही प्रशिक्षण घेतले त्याप्रमाणे मी देखील माझ्या विद्यार्थ्यांना सहज व सोप्या पद्धतीने कसे शिकवता येईल हा प्रयत्न करीत आहे, जसे की, विषय शिकवत असतांना भवतालच्या परिसराशी त्याची जोडणी करणे, त्यावर विद्यार्थ्यांची मते जाणून घेणे, ही मते मांडत असतांना वर्गात खेळीमेळीचे वातावरण ठेवणे जेणेकरून प्रत्येक विद्यार्थी सदर विषयाशी सहज जोडला जाईल. खरचं खूप छान वाटते जेव्हा प्रत्येक विद्यार्थी या प्रक्रियेत सहभाग घेतो व त्याच्या स्वतःच्या संकल्पना ठामपणे इतरांना सांगतो. या सर्व दैनंदिन बाबींमुळे माझ्या विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास दृढ होत चालला आहे. विद्यार्थी हे स्वतःच स्वतःचे निरीक्षण करू लागले आहेत व एकमेकांचा आदर देखील करू लागले आहेत. तसेच ते नवीन शिक्षण पद्धती विषयी अवगत होत चालले आहेत. या नवीन student centric शिक्षण पद्धतीबद्दल मी विद्यार्थ्यांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना हि शिक्षण पद्धती अतिशय सोपी व आवडीची वाटत आहे. मला सांगायला आवडेल कि मी आजवर आम्ही प्रशिक्षणात शिकलेल्या group discussion, activities, skits, keyword finding, flipped classroom, individual perceptions, connection reflection, experimentation, open source software आदी घटकांचा उपयोग करून पूर्वतयारीने रोज नवीन काहीतरी विद्यार्थांना देण्याचा प्रयत्न करत आहे. माझ्या सर्वच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील भाव हे मला खूप सुखद अनुभूती देणारे असतात. मी खरंच आभारी आहे महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संसंस्थेच्या टीमची, प्रशिक्षणास लाभलेल्या मान्यवरांची व माझ्या प्रशिक्षणार्थी मित्र मैत्रिणीची ज्यांनी मला नवीन संकल्पना व त्यांचे अनुभव सहज देवू केले. मी तुम्हा सर्वांकडून घेतलेच अनुभव जणू माझ्या विद्यार्थीमित्रां बरोबर अवसरीत रोज घेण्याचा एक छोटासा प्रयत्न करीत आहे!

